कार्यक्रम आयोजित केला होता, यावेळी नंदेक्ष साबुनकर आशिष मुणगेकर, महेंद्र दिघे, सागर पवार, नितीन संतोष सुकडे, नितीन बेळणेकर, बंधू राऊळ, अनिल बाजपेयी, विजय मयेकर आदिसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

फडणवीस यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा झाली.

पत्रकार अभिव्यक्ती मंचच्या वतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण, दिलीप सपाटे, यदु जोशी, विशाल सिंग, पंकज दळवी, हा कायदा बनावला जात आहे. हा कायदा कुणा व्यक्तीच्या विरोधात नसून तो नक्षली प्रवृत्तींना बळ देणाऱ्या संघटनांच्या विरोधात राबविला जाणार आहे. त्यामुळे बंदी घातलेल्या संघटनांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या संदर्भातच हा कायदा लागू होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दहिसर पोलिस स्टेशनने जप्त केलेली वाहने परत घेण्याचे जनतेला आवाहन

प्रतिनिधी

■ मुंबई

गेल्या अनेक वर्षांपासून दहिसर पोलिस स्टेशनाच्या हद्दीत आढळलेले बेवारस दुचाकी/तीनचाकी महागड्या वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात गंजलेली, धुळीने माखलेल्या, जीर्ण अवस्थेत पडलेल्या आहेत. अशी एकूण ६२ वाहने आढळल्यानंतर, त्यांचे मालक किंवा चालक त्यांची वाहने घेण्यासाठी दहिसर पोलिस ठाण्यात प्रत्यक्ष हजर झाले नाहीत किंवा त्यांच्याशी संपर्कही साधला नाही. असे असूनही, विभागाकडून वाहनांच्या मालकांची शोध घेण्यासाठीही सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत, दहिसर पोलिस स्टेशन चे ए.एम.देसाई पोलिस निरीक्षक (प्रशासन) यांनी संबंधित वाहनांच्या मालकांच्या तसेच नागरिकांच्या माहितीसाठी ८ एप्रिल २०२५ रोजी वाहन क्रमांकांसह संपूर्ण तपशीलवार यादी जारी केली आहे.

अशा भंगार वाहनांमुळे पोलिस ठाण्याच्या आवारात जागा अपुरी पडून असून वाहतूक कोंडी सारख्या समस्या निर्माण होत आहे. सदर वाहन जीर्ण व गंजलेल्या अवस्थेत असल्याने परिसरात रोगराईचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे., वाहन मालकाने पुढील पंधरा दिवसांत त्याच्या वाहनाच्या मालकीच्या योग्य त्या कागदपत्रांसह दहिसर पोलिस ठाण्यात हजर राहून आपले वाहन ताब्यात घ्यावे, अन्यथा सदर वाहनांबाबतीत योग्य ती कायदेशीर प्रक्रिया राबवून निर्गती करण्यात येईल असे दहिसर पोलीस ठाण्यान जनहितार्थ आवाहन जारी केले आहे.

Scanned by PDF Scanner